# मेट्रो 3 होणार ऑन टाइम

## मेट्रोमॅन ई श्रीधरन यांची ग्वाही

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम अत्यंत काटेकोर व प्रगतीपथावर असून याबाबत मेट्रोमॅन ऑफ इंडिया अशी ओळख असलेले डॉ. ई श्रीधरन यांनी समाधान व्यक्त केले आहे. मुंबईसारख्या शहरात भूमिगत मेट्रोची कार्यप्रणाली समाधानकारक असल्याचे मतही श्रीधरन यांनी व्यक्त केले आहे.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गाचे काम अत्यंत्य वेगाने सुरू आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या टीबीएम मशीनच्या मदतीनेच मुंबईत भुयार खोदण्याचे काम सुरू असून धारावी ते दादर या पॅकेजमधील भुयार खणण्यास मदत झाली आहे. एमएमआरसीचे अधिकारी व सल्लागार यांना सोबत घेऊनच आज मेट्रो ३ मार्गिकेचा दौरा केला. यादरम्यान विविध पद्धतीच्या कामाची माहिती त्यांनी घेतली. देशातील सर्वाधिक क्लिष्ट आणि तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक असा हा प्रकल्प असल्याचे मत डॉ. ई श्रीधरन यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे मुंबईसारख्या बेटावर भूमिगत मेट्रोचे शिवधनुष्य पेलल्याबद्दल एमएमआरसीचे कौतुक करणे आवश्यक असल्याचे मतही श्रीधरन यांनी व्यक्त केले.

श्रीधरन यांनी कोकण रेल्वे व दिल्ली मेट्रोच्या कामासाठी अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे दिल्ली, लखनौ, कोचीन, जयपूर मेट्रो या मेट्रो मार्गिकेच्या कामकाजादरम्यान सल्लागाराची भूमिका बजावल्याने आव्हानांचा सामना करावा लागला होता. त्यामुळेच मेट्रो ३ च्या कामाबाबत असणारे अभियांत्रिकी पद्धतीच्या आव्हानाची पूर्ण कल्पना श्रीधरन यांना आहे. त्यामुळे या मेट्रो मार्गिकेचे काम अत्यंत वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास श्रीधरन यांनी व्यक्त केला आहे. एमएमआरसीच्या माध्यमातून सुरू असलेले हे काम पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगत पारदर्शक, विश्वासार्ह, यशस्वी असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले आहे.